**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

क्र.संगाबाअवि/ 535/2022
दिनांक :- 5/8/2022

**प्रती,**
**प्राचार्य/विद्यार्थी/**
**संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज/**
**विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक विभाग**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी**
**संलग्नित सर्व महाविद्यालये**

**विषय : उन्हाळी 2022 परीक्षेपासून पुनर्मूल्यांकन, उत्तरपत्रिका फोटोकॉपी (सॉफ्टकॉपी) तथा रिड्रेसल ची सुविधा सुरु करण्याबाबत.**

महोदय/ महोदया,

वरील विषयान्वये सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, **उन्हाळी 2022 परीक्षेपासून विद्यार्थ्यांसाठी पुनर्मूल्यांकन, उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी** (Softcopy of Answer Book) **तथा रिड्रेसल ची सुविधा सुरु करण्यात येत असुन, ज्या परीक्षा ऑनलाईन प्रणालीद्वारे संचालीत केल्या जातात (**BA, BCom, BSc, Engineering**) ह्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांव्यतीरीक्त इतर परीक्षांसाठी www.redressal.sgbau.ac.in ह्या संकेस्थळावरुन पुर्वीच्याच पध्दतीने पुनर्मूल्यांकन, उत्तरपत्रिका फोटोकॉपी** (Softcopy of Answer Book) **तथा रिड्रेसल ची सुविधा सुरु करण्यात आली आहे.**

**संबंधीत सर्व विद्यार्थ्यांना पुनर्मूल्यांकन तथा उत्तरपत्रिका सॉफ्टकॉपीसाठी ऑनलाईन आवेदनाकरीता दिनांक 06/8/2022 रोजी सकाळी 11.00 पासून www.redressal.sgbau.ac.in** ह्या संकेस्थळावरुन अध्यादेश क्र. 16/2007 च्या अनुषंगाने उन्हाळी 2022 परीक्षांपासून विद्यार्थ्यांना एक किंवा दोन विषयांच्या उत्तरपत्रिकांची फोटोकॉपीसाठी आवेदन करु शकतात. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका झेरॉक्स ऐवजी Scan केलेल्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या Log in मधे किंवा Email वर पाठविण्यात येतील. ज्या तारखेत उत्तरपत्रिका पाठविल्या जाईल त्या तारखेपासून 10 दिवसांपर्यंत Redressal करीता (Reassessment after obtaining Scan copy of Answer-book) ऑनलाईन आवेदन करु शकतात.

तथा निदेश क्र. 16/2019 मधील तरतुदींच्या अनुषंगाने मूळ निकालाच्या तारखेपासून 15 दिवसांपर्यंत विद्यार्थी एक किंवा दोन विषयांसाठी Reassessment करीता (Reassessment without obtaining Scan copy of Answer-book) ऑनलाईन आवेदन करु शकतात.

उपरोक्त परीक्षांसाठी आवेदन करताना विद्यार्थ्यांना संकेतस्थळावर Help for Online Application (ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मदत) यामधे सर्व माहिती दिलेली आहे. त्यानंतर आवेदनाची प्रिंट (Hard Copy) मुळ गुणपत्रिका व शुल्क भरलेल्या पावतीसह गोपनीय विभागामधे तातडीने स्वहस्ते किंवा पोस्टाद्वारे जमा करावयाचे आहे. फक्त **Photocopy / Scan** उत्तरपत्रिकांच्या आवेदनासोबत मुळ गुणपत्रिकेऐवजी झेरॉक्स किंवा ऑनलाईन प्रत जोडावी.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकन आवेदन सुरु होत असल्याबाबत सर्व विद्यार्थांना आपल्या स्तरावर अवगत करुन देण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर माहिती दयावी. अडचणी येत असल्यास संबंधीत अधिका-यांशी संपर्क साधून त्याबाबत महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे याद्वारे कळविण्यात येत आहे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ